# कार्यालय नागपूर महानगरपालिका
# (आस्थापना विभाग)

१ ला माळा, छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत,
महानगरपालिका मार्ग4 40001-सिव्हील लाईन्स नागपूर ,
दुरध्वनी क्र2567032-0712-.  ईमेल-(gadnmcnagpur@gmail.com)

जाहिरात क्र./ 568 /पी.आर दिनांक :- 18 /10/2023

## थेट मुलाखत

नागपूर महानगरपालिकेत नगर रचना विभागांतर्गत भौगोलीक माहिती (GIS Platform) प्रणालीच्या माध्यमातून विकास योजना तयार करतांना जमीन वापर नकाशा (ELU) व प्रस्तावित जमीन वापर नकाशा (PLU) नकाशामध्ये कोणत्या बाबी असाव्यात त्याचप्रमाणे प्रणालीचे कोणते स्तर (Layers) असावेत, याबाबत नागपूर शहराचा (मुळ हद्द व वाढीव हद्द) विद्यमान जमीन वापर नकाशा अद्यावत करून घेण्यासाठी, कामाचा व्याप विचारात घेता ४ कंत्राटी GIS (Geographic Information System) Experts (भौगोलीक माहिती प्रणालीतज्ञ सल्लागार) व १४ कंत्राटी GIS (Geographical Info System) Assistants (भौगोलीक माहिती प्रणाली सहाय्यक सल्लागार) ची कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात प्रथमत: ६ महिन्या करिता खालील पात्रता व अटी / शर्तीनुसार नियुक्ती करावयाची असून, संबंधितांनी आपले अर्ज दि. ३०/१०/२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत नियमानुसार सादर करावे. त्यानंतर पात्र सर्व उमेदवारांची नियुक्ती करण्याकरीता थेट मुलाखती करीता आवश्यक कागदपत्रासह दि. 07/11/2023 रोजी सकाळी 12:00 वाजता, अतिरिक्त आयुक्त (सामान्य), सिव्हील लाईन मनपा नागपूर यांचे कार्यालय येथे उपस्थित राहावे.

**<u>भरावयाच्या रिक्त पदांचा सामाजिक / समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.</u>**

| अक्र. | प्रवर्ग | अजा पदे (13%) | अज पदे (7%) | वि जा अ पदे (3%) | भ ज ब. पदे (2.5%) | भ ज क. पदे (3.5%) | भ ज ड. पदे (2%) | विमाप्र पदे (2%) | इमाव पदे (19%) | आदुघ पदे (10%) | अराखीव पदे (38%) | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | <u>भौगोलीक तज्ञ सल्लागार</u> GIS Experts | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 4 |
| | **समांतर आरक्षणाचे विवरणपत्र** | | | | | | | | | | | |
| 1 | सर्वसाधारण | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 3 |
| 2 | महिला – (30%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| 3 | माजी सैनिक – (15%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 4 | खेळाडू – (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 5 | प्रक्लपग्रस्त – (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 6 | भुकंपग्रस्त – (2%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 7 | अंशकालीन पदवीधर- (10%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 8 | दिव्यांग – (4%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 9 | अनाथ - (1%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | **एकूण** | **1** | **0** | **1** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | 0 | **2** | **4** |

| अक्र. | प्रवर्ग | अजा पदे (13%) | अज पदे (7%) | वि जा अ पदे (3%) | भ ज ब. पदे (2.5%) | भज . कपदे (3.5%) | भ ज ड. पदे (2%) | विमाप्र पदे (2%) | इमाव पदे (19%) | आदुघ पदे (10%) | अराखीव पदे (38%) | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **भौगोलीक सहाय्यक सल्लागार** GIS Assistant | 2 | 1 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 3 | 1 | 5 | 14 |
| | **समांतर आरक्षणाचे विवरणपत्र** | | | | | | | | | | | |
| 1 | सर्वसाधारण | 1 | 1 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | 1 | 1 | 8 |
| 2 | महिला – (30%) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 2 | 4 |
| 3 | माजी सैनिक – (15%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| 4 | खेळाडू – (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 5 | प्रक्लपग्रस्त – (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 6 | भुकंपग्रस्त – (2%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 7 | अंशकालीन पदवीधर- (10%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| 8 | दिव्यांग – (4%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 9 | अनाथ - (1%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | **एकूण** | **2** | **1** | **1** | **0** | **1** | **0** | **0** | **3** | 1 | **5** | **14** |

## शैक्षणिक अर्हता आणि अनुभव तसेच वयोमर्यादा

| अ.क्र | पदाचे नाव | एकुण पद | वयोमर्यादा | शैक्षणिक अर्हता व अनुभव | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **“ भौगोलीक तज्ञ सल्लागार”)** GIS Experts | 4 | कमाल 40 वर्षे | 1. शासकीय प्रकल्पांवर काम केलेल्या उमेदवारांस प्रधान्य देण्यात येईल.<br>2. GIS Experts– **Degree** (in any field) **/ Diploma (**in any field) **/ B.E.** will be preferable + min 8 वर्षाचा अनुभव in Q-GIS & ARC-GIS | 68.000/- प्रति महिना |
| 2 | **“भौगोलीक सहाय्यक सल्लागार” (**GIS Assistants**)** | 14 | | 1. GIS Assistants **Degree** (in any field) **/** Diploma (in any field**)** + min 4 वर्षाचा अनुभव in Q- GIS & ARC-GIS | 43,000/- प्रति महिना |

वरील पदाकरीता इच्छुक उमेदावारांनी दि. 30/10/2023 पर्यंत कार्यालयीन वेळेत आपले नाव नोंद करावे. वेळे नंतर येणाऱ्या उमेदवारांच्या नावाची नोंद करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**अर्हता :-**

1. शासन निर्णय दि. ०५.०१.२०१९ व समक्रमांकाचे शुद्धीपत्रकात दिलेल्या भौगोलीक माहिती प्रणालीच्या (GIS) विविध स्तरांमध्ये (Layers) काम करण्याइतके नैपूण्य प्राप्त असावे.

2. शैक्षणिक अर्हता व अनुभव : शासकीय प्रकल्पावर काम केलेल्या उमेदवारांस प्राधान्य देण्यात येईल.
   GIS Experts– **Degree/B.E/ Diploma** + min 8 वर्षाचा अनुभव in Q-GIS & ARC-GIS
   GIS Assistants **Diploma / Degree** + min 4 वर्षाचा अनुभव in Q- GIS & ARC-GIS
   उमेदवारांस मराठीचे उत्तम ज्ञान असावे.
3. संबंधित कर्मचाऱ्यांचे साप्ताहिक, मासिक व अर्धवार्षिक याप्रमाणे कार्यमुल्यमापन करण्यात येईल व गुणवत्तेच्या आधारावर कर्मचाऱ्यास कायम ठेवावे किंवा नाही. याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना असतील.
4. कोणतीही पूर्वसूचना न देता कर्मचाऱ्यांची नियुक्ती रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्त, महानगरपालिका नागपूर, यांना राहतील.
5. सदर कर्मचारी या कार्यालयाच्या उपसंचालक – नगर रचना, नगर रचनाकार, सहाय्यक नगर रचनाकार, यांना आवश्यकतेनुसार वेळोवेळी अहवाल सादर करण्यास बांधील असतील.
6. आवश्यक त्या अटी व शर्तीना बांधील राहून सदर कर्मचाऱ्यांना त्यांच्या अनुभवाच्या आधारे मासिक मानधनाचे वाटप विकास योजनेसाठी राखीव रक्कमेतून उपसंचालक, नगर रचना, इमारत विभाग, नागपूर महानगरपालिका, नागपूर विभागाच्या लेखाशिर्षाखाली देणे योग्य होईल.
7. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.
8. सदर पदाची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पद्धतीने असेल.
9. या पदावरील अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.
10. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दिलेल्या प्रत्रात भरून थेट सादर करावेत. इतर प्रपत्रात सादर केलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.
11. शासन निर्णय दि. ९ फेब्रुवारी, २०१८ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने करार/कंत्राटी पद्धती निर्माण केलेल्या पदांवर नेमणूकीच्या अटी-शर्तीबाबत तसेच सदर नियुक्त कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित न करण्याबाबत नमुद असल्याने उक्त पदावरील नियुक्ती ही निवड कंत्राटी स्वरूपाची असून, पुढे नियमित करण्यात येणार नाही.
12. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीचा मानधनापोटी होणारा खर्च नगर रचना विभागाच्या व्यय अंदाजपत्रक अर्थसंकल्पीय सांकेतांक (A21001822602) मधून राहील.
13. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विविक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीशी राहील. व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल, तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती, मान्य असल्याचे बंधपत्र/हमीपत्र उमेदवाराला दयावे लागेल.
14. करार पध्दतीवरील उमेदवारांना नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.
15. उमेदवारांनी निवड प्रक्रिये दरम्यान नागपूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वरील सुचनांची नोंद घ्यावी. तसेच इतर कोणत्याही मार्गाने सुचना देण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
16. मुलाखती अंती प्राप्त गुणानुसार गुणवत्ता यादी व प्रतिक्षा यादी मनपाचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येवून त्यानुसार आदेश निर्गमित करण्यात येईल.

उपरोक्त पदाकरिता अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावयाचा असून अर्जाचा नमूना व उक्त पदांकरिता आवश्यक अर्हता/अटी/शर्ती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वर उपलब्ध आहे.

हस्ता/- डॉ. अभिजीत चौधरी
आयुक्त तथा प्रशासक
महानगरपालिका, नागपूर

दिनांक :- / /2023

# **अर्जाचा नमूना**

1. पदाचे नाव :- ..................................................................................
2. अर्जदाराचे नांव :- ..................................................................................
3. पूर्ण पत्ता :- ..................................................................................

   ..................................................................................

   भ्रमणध्वनी क्रमांक :- ..................................................................................

   ई-मेल आय डी :- ..................................................................................

4. जन्म दिनांक :- ..................................................................................

5. दि. / /2023 ला वय :- ..................................................................................

6. शैक्षणिक पात्रता :- ..................................................................................

| उत्तीर्ण परिक्षा | विद्यापीठ | श्रेणी | टक्केवारी | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

7. अनुभव :- ..................................................................................

| अ.क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेल्या पदाचे नाव | कालावधी (पासून-पर्यंत) | कामाचा अनुभव |
|---|---|---|---|---|
| | | | | |

मी प्रतिज्ञा पूर्वक सादर करतो / करते की, उक्त नमूद माहिती खरी असून, मी सदर जाहीरातीच्या सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचून उक्त माहिती भरली आहे. तसेच माझे चारित्र चांगले असून माझे विरूद्ध कोणताही गुन्हा दाखल नाही.

स्वाक्षरी